## <u>रे.मु.नं.२४५/१९८७ मधील निशाणी क्र.३०९ वरील आदेश</u>

वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. वादीचे अर्जात असे कथन आहे की, वादीने वाटपासाठी दावा दाखल केलेला आहे. वादी व प्रतिवादी हे हिंदु एकत्र कुटूंबातील आहेत. प्रस्तुत दाव्यामध्ये व दुरुस्त दाव्यामध्ये केलेल्या दुरुस्तीनुसार पूर्वी दाव्यामध्ये समाविष्ट प्रतिवादी क्र.१४ रामचंद्र आंबोजीराव देशमुख (मयत) तर्फे वारस प्रतिवादी क्र.१४-अ ते १४-ई तसेच मयत प्रतिवादी क्र.१५ लक्ष्मण साहेबराव देशमुख, प्रतिवादी क्र.१५-अ (मयत) तर्फे वारस प्रतिवादी क्र.१५-ब ते १५-ऊ यांची दुरुस्त दाव्यात असलेली नावे नंतरच्या दुरुस्त दाव्यात नजरचुकीने नमूद झालेली नाहीत. त्यामुळे त्यांची नावे नमूद करणे आवश्यक आहे. तसेच दुरुस्त दाव्यातील मौजे अकलूज जुने सर्व्हे नंबर मिळकतीचे कलम १-अ मध्ये मिळकतीचे वर्णनाचे तक्त्यामधील अ.क्र.५ मध्ये नमूद केलेले मिळकतीचे वर्णन सर्व्हे नं.४७७/१अ१, क्षेत्र ०२ हे. २८ आर + पो.ख. ०० हे. ४१ अशी दुरुस्ती करणे जरुरीचे आहे. तसेच अ.क्र.७ मध्ये सर्व्हे नंबर ४७५/२ब ऐवजी सर्व्हे नं.४७५/३ब अशी दुरुस्ती करणेचे आहे. त्याचप्रमाणे अ.क्र.८, १२, १७, २०, २१, २४, २५ मध्ये अर्जात नमूद केलेप्रमाणे दुरुस्ती करावयाची आहे. तसेच दावा कलम १-क मध्ये सर्व्हे नं. ४७५/२अ२ नजरचुकीने पुन्हा नमूद करण्यात आला आहे. तो कमी करावयाचा आहे. त्याचप्रमाणे दावा कलम १-अ मध्ये अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे. तसेच वादीने मौजे चौंडेश्वरवाडी नवीन सर्व्हे नंबर मिळकतीचे वर्णन कलम १-ई मध्ये नमूद केलेले आहे. त्यात अ.क्र.२, ४ १२, १३, १४ १७, २१, २२, २५ २६, २७ मध्ये अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती मागितली आहे. तसेच दावा कलम ४-अ मधील ओळ क्र.१ मध्ये दिवाणी न्यायालयात रे.मु.नं. ९९४/२००६ ऐवजी ९६४/२००६ असे नमूद करावयाचे आहे. तसेच दावा कलम ५ मधील ६ व्या ओळीत अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती मागितली आहे. त्याचप्रमाणे वादीस नवीन कलम ५-अ नमूद करावयाचा आहे. दाव्यातील कलम ९ मध्ये दाव्याची आकारणी मध्ये ओळ क्र.३ मध्ये, दाव्यातील कलम १० विनंती कलम अ, ब, क मध्ये दुरुस्ती करावयाची आहे. त्याचप्रकारे दाव्यातील कलम १० विनंती मध्ये कलम

१०-ग चे खालील नवीन विनंती कलम समाविष्ट करावयाचे आहे व (घ) मध्ये अर्जाप्रमाणे दुरुस्ती करावयाची आहे. तसेच विनंती कलम च, छ, ज नमूद करावयाचे आहे. येणेप्रमाणे दावा मिळकतीसंबंधी व दाव्यामध्ये झालेल्या चुकीच्या अनुषंगाने वरनमूद केलेल्या मजकूराप्रमाणे सर्व आवश्यक दुरुस्त्या दाव्यामध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. सबब, अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. ५ ते ८ व २५ ते २८ यांनी वादीच्या प्रस्तुत अर्जास निशाणी ३१९ कडे म्हणणे सादर करुन वादीच्या अर्जास तिव्र हरकत नोंदविली आहे. या प्रतिवादींनी त्यांचे म्हणण्यात पुढे असे कथन केले आहे की, वादी यांनी सन १९८७ साली दावा दाखल केलेला आहे. वादीतर्फे पुरावा चालू झालेला आहे. त्यानंतर वादी यांनी वेगवेगळे अर्ज देऊन व दुरुस्त्याची मागणी करुन सदर दाव्याचे कामकाज लांबविले आहे. मात्र सि.पी.सी ऑ.६ रुल १७ व दिवाणी प्रक्रिया संहिते मध्ये दिनांक ०१.०७.२००२ रोजी झालेल्या दुरुस्तीप्रमाणे एकदा दाव्याचे कामकाज चौकशीस लागल्यानंतर पुन्हा तशी दुरुस्ती मागता येत नाही. सदर दाव्याचे कामकाज चौकशीस नेमले असताना पुन्हा वादीने दिनांक ०२.०२.२०२१ रोजी दुरुस्तीचा अर्ज दिलेला आहे. त्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता ऑ. ६ रुल १७ अन्वये वादीचा अर्ज कायदेशीर नाही. वादी प्रस्तुत अर्जाद्वारे जी दुरुस्ती मागत आहे ती पूर्णपणे संदिग्ध अशी असून मूळ दाव्याशी विसंगत अशी आहे. सदर अर्जाद्वारे वादी नवीन केस मांडू पहात आहे. वादीची सदरची दुरुस्ती मुदतीत नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. प्रतिवादी क्र.२ (१) ते २ (७) व २० ते २२ यांनी प्रस्तुत अर्जास निशाणी ३२१ कडे म्हणणे देऊन अर्जास तीव्र विरोध दर्शविला आहे. सदर प्रतिवादींनी प्रतिवादी क्र.५ ते ८ व २५ ते २८ प्रमाणेच कथन केले आहे.

४. अर्ज व म्हणणे पाहिले. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादींनी दावा हा सरस-निरस वाटपासाठी दाखल केला असल्याने व दाव्यातील गुंतागुंत टाळण्याकामी वाटपाच्या दाव्यास आवश्यक असणाऱ्या नियोजीत प्रतिवादींना दाव्यात समाविष्ट करणे आवश्यक आहे.

तसेच दावा मिळकतीपैकी काही मिळकतींचे क्षेत्र, सर्वे नंबर नजरचुकीने चुकीचे नमूद केलेले आहे. तर काही मिळकतींचा दोनदा उल्लेख झालेला आहे. सदरचे क्षेत्र, सर्वे नंबर दुरुस्ती केल्यास व दोनदा नमूद झालेल्या मिळकती वगळण्यास परवानगी दिल्यास दाव्याच्या आशयात कोणताही बदल होत नाही. सर्वे नंबरचे क्षेत्र व त्या अनुषंगाने दाव्याची आकारणी, मागणी, वगैरे दुरुस्ती मागितली असल्याने सदरच्या नियोजीत दुरुस्तीने मूळ दाव्याच्या आशयात बदल होत नाही. याउलट सदरच्या दुरुस्तीने दावा गुणवत्तेवर निर्णीत होण्यास व पुढील गुंतागुंत टाळण्यास मदतच होणार आहे. सदरची दुरुस्ती ही वादीने पुरावा सुरु झाल्यानंतर मागितली असली तरीदेखील वादी, प्रतिवादी मधील वाद कायमस्वरुपी संपुष्टात आणण्यासाठी दाव्याच्या कोणत्याही स्टेजला अशा प्रकारची दुरुस्ती मागता येते. त्यामुळे दाव्याच्या अंतिम न्यायनिर्णयासाठी सदरची दुरुस्ती होणे जरुरीचे आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने मूळ दाव्यात विहीत मुदतीत अर्जात नमूद केलेली दुरुस्ती करुन दुरुस्ती प्रत दाखल करावी.

माळशिरस — ( जी. एम. नदाफ )

दि.२०.०४.२०२१ — सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माळशिरस

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P.D.F. File order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S.S.Mitragotri |
| Name of the court | : | J.M. F.C. Malshiras. |
| Order signed on | : | 19.12.2020 |
| Judgment uploaded on | : | 19.12.2020 |